डअउइक्अघढ्ख झठअघअड्क

ठशसव. छे. १०२३/५७

## बुक पोस्ट

प्रति,

द्वारा

**सद्भक्ति-प्रसारक मंडळी**

श्रीशंकर लॉज, सरस्वतीबाग,

जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०० ०६०.

**शब्दविकास :** विद्या धुमे, विकास प्रिंटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ६०.फोन : २८२४५२७२




(वर्ष ९४) आषाढ ते भाद्रपद - शके १९४४ - जुलै ते सप्टेंबर २०२२ (संयुक्तांक १० ते १२)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | विशेष सूचना | ६ |
| ३) | गुरुवर्य श्री. भाईंचे प्रवचन | ७ |
| ४) | सद्‌गुरु श्री. दादाभाईंचे प्रवचन | ११ |
| ५) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | १५ |
| ६) | अमृतकण | २० |
| ७) | निवेदन | २२ |

**।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।**



## - संपादकाचे बोल -

## (वर्ष ९४) चैत्र ते ज्येष्ठ (शके १९४४) (एप्रिल ते जून)
## (संयुक्तांक ७ ते ९)

### चैत्र, वैशाख, ज्येष्ठ (एप्रिल ते जून) महिन्यातील कार्यक्रमांचा गोषवारा

श्री सद्‌गुरुकृपेने मंदिराची सेवा पूर्ववत सुरू झाली आहे. वर्ष अखेरचा हा अंक सादर करीत आहोत. ही सेवा आता कायम सुरू रहावी हीच सद्‌गुरु चरणी कळकळीची प्रार्थना आहे.

शनिवार दि. २.४.२०२२ (चैत्र शुद्ध प्रतिपदा) रोजी गुढीपाडवा होता. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली. रात्रौ ९ वाजता श्री रामेश्वर

मंदिरातर्फे पालखी मिरवणूक संपन्न झाली.

शनिवार दि. ९.४.२०२२ रोजी (चैत्र शुद्ध अष्टमी) आद्य सद्गुरु श्री नारायण महाराज व श्री लक्ष्मण महाराज यांच्या इंदूर येथील पादुका स्थापना दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. सायंकाळी ५ वाजता श्री लक्ष्मण महाराजांच्या चरित्राचे वाचन झाले.

रविवार दि. १०.४.२०२२ रोजी (चैत्र शुद्ध नवमी) श्री रामनवमी होती व श्री सोहिरोबानाथ पुण्यतिथी दिन होता. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली. दुपारी १२ वाजता श्री रामजन्मोत्सव साजरा झाला. त्यापूर्वी श्रीरामभक्तीपर पदे व भजने म्हणण्यात आली. जन्माचे वेळी (१) बाळा जो जो रे कुलभूषणा। दशरथ नंदना।। (२) विश्व डोलारा मागी आत्मा हरि ह्या पाळण्यानंतर (३) रामदर्शनासि चला। लाभ हा मला (४) छत्र सिंहासनी अयोध्येचा राजा। नांदतसे माझा रामचंद्र (५) ज्याचे वंशी कुळधर्म राम सेवा। त्याचे वंशी मज जन्म देगा देवा आणि शेवटी (६) टाकियला निजभार रामा टाकियला निजभार ही प्रार्थना म्हणण्यात आली. रात्रौ ९ वाजता रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक निघाली.

शनिवार दि. १६.४.२०२२ ला (चैत्र पौर्णिमा) रोजी श्री हनुमान जयंती होती. सकाळी स्तवन व प्रार्थना झाल्यावर ६.३० वाजता जन्मोत्सव झाला. रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक निघाली.

शुक्रवार दि. २९.४.२०२२ रोजी (चैत्र वद्य त्रयोदशी) श्री अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली.

शनिवार दि. ३०.४.२०२२ (चैत्र वद्य अमावस्या) श्री सद्गुरु पार्वतीमाता पुण्यतिथी दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना म्हणण्यात आली.

## परम भगवद्भक्त श्री वामन पंडित पुण्यतिथ्योत्सव

मंगळवार दि. ३.५.२०२२ (वैशाख शुद्ध तृतीया) अक्षय तृतीया होती व श्री परशुराम जयंती होती. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

गुरुवार दि. ५.५.२०२२ (वैशाख शुद्ध चतुर्थी) श्री रामानुजाचार्य जयंती होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली.

शुक्रवार दि. ६.५.२०२२ (वैशाख शुद्ध पंचमी) आद्य श्री शंकराचार्य जयंती होती. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. सायंकाळी ६ वाजता हळदीकुंकू समारंभ झाला.

शनिवार ७.५.२०२२ (वैशाख शुद्ध षष्ठी) रोजी श्री वामन पंडितांची पुण्यतिथी होती. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली. ११.३० वाजता गुरुपादुकांस एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) अनेक जन्मे साधन करिता —— मुक्ति जे (४) गोविंदा गोपाळा मज तारि। भवनदी भयंकर वाटे भारी (५) आम्ही जाणो हरिचे पाय। नेणो अन्य उपाय (६) आनंद मनी हा झाला। पाहतां श्री वामन पदकमळाला (७) तारि मला ——- (८) गोविंदु घ्या बाई गोपाळु घ्या गे (९) जय वामन श्री वामन म्हणू आम्ही आता (१०) ध्याता सुत कामिनी। जाती दिन यामिनी।। घडी एक तरी मनी आठवा राम (११) सद्गुरु राया चुकवी जन्म मरण। जन्म हा न लगे वंदिता तव चरण (१२) आणि शेवटी तुमच्या चरणां मागो हेचि दान। प्रसन्न होवोनि द्यावे आम्हां।। ही प्रार्थना म्हणण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण झाले व सद्भक्तांनी महाप्रसादाचा आनंदाने लाभ घेतला.

सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन झाले व त्यावेळी ही भावपूर्ण पदे म्हणण्यात आली. रात्रौ ९ वाजता सद्भक्ती मंदिरातर्फे पालखी मिरवणूक भक्तीपूर्ण पदांनी संपन्न झाली.

रविवार दि. ८.५.२०२२ (वैशाख शुद्ध सप्तमी) सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले.

सोमवार दि. ९.५.२०२२ (वैशाख शुद्ध अष्टमी - दुर्गाष्टमी) सायंकाळी ६ वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण झाले. रात्रौ ८.३० वाजता गुरुवर्य श्री भाईंचा शेजोत्सव संपन्न झाला.

मंगळवार दि. १०.५.२०२२ (वैशाख शुद्ध नवमी) रोजी उत्सव समाप्ती झाली व श्री सद्गुरुंनी कृपादृष्टी ठेवून आमची सेवा अविरत मान्य करून घ्यावी अशी कळकळीची प्रार्थना करण्यात आली.

शनिवार १४.५.२०२२ (वैशाख शुद्ध चतुर्दशी) रोजी श्री नृसिंह जयंती होती. प्रात:स्मरणाचे नंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली. सायंकाळी ५.३० वाजता ही भजन सेवा गुरुबंधु श्री सदाशिव उभयकर ह्यांच्याकडून असते.

## परमगुरुवर्य श्री शंकर व्यंकटेश टाकी उर्फ श्री बाबांचा पुण्यतिथ्योत्सव

रविवार दि. २९.५.२०२२ (वैशाख वद्य चतुर्दशी) रोजी गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथी दिन होता. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना झाली. ११.३० वाजता गुरुपादुकांस एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) म्यां शंकर पूजिला, भावे पूजिला (४) शंकर भोळा हो भोळा (५) येई येई गुरुराज आज। झडकरि मज तारी (६) हरि तुझी भक्ति मला देई (७) धाव दयाघन, धाव कृपाघन। धाव समर्था विश्वपते। (८) टाकी कुलश्रेष्ठ शंकरा। घ्या पदरी पामरा आणि शेवटी (९) करी ऐसे सद्गुरु देवराया ही प्रार्थना म्हणण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण झाले. दोन वर्षानंतर अधिकच रूचकर लागणाऱ्या महाप्रसादाचा लाभ सर्व सद्भक्तांना मिळाला. सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन झाले.

सोमवार दि. ३०.५.२०२२ला सायंकाळी श्री बाबांच्या ध्वनिमुद्रित पदांचं श्रवण झालं.

मंगळवार दि. ३१.५.२०२२ (ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा) सांयकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले व सुमधुर पदे म्हणण्यांत आली. त्यानंतर हळदीकुंकू समारंभ पार पडला आणि उत्सव समाप्ती झाली. गुरुवर्यांनी सेवा करण्यास बळ द्यावे व आम्हा अज्ञबालकांची सेवा मान्य करून घ्या अशी कळकळीची प्रार्थना करण्यात

आली.

गुरुवार दि. ९.६.२०२२ (ज्येष्ठ शुद्ध दशमी) गंगावतरणदिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली.

शुक्रवार दि. २४.६.२०२२ (ज्येष्ठ वद्य एकादशी) श्री निवृत्तिनाथ पुण्यतिथी दिन होता. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

**: इति :**

# विशेष सूचना

ह्यापूर्वी कळवल्याप्रमाणे आपले संकेतस्थळ (Website) https://sadbhaktimandir.com. फेसबुक पेज Sadbhakti Mandir आणि You Tube चॅनेल Sadbhakti Mandir हे सर्व कार्यरत आहेत आणि सद्भक्तांनी त्यांचा लाभ घ्यावा. शिवाय मित्रमंडळींना ह्या विषयी माहिती द्यावी.

# सद्भक्तांना आवाहन आणि आभार प्रदर्शन

हे कळविण्यास आनंद होत आहे की येणाऱ्या शताब्दी वर्ष महोत्सवाच्या निमित्ताने सद्भक्ती मंदिराच्या डागडुजीसाठी, सुशोभिकरणासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीकरिता केलेल्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळून अत्यावश्यक अशी सर्व कामे जवळपास पूर्ण झाली आहेत. सद्भक्तांनी समयोचित केलेल्या ह्या मदतीकरिता त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे.

अर्थात अजूनही काही किरकोळ कामे शिल्लक आहेत. शिवाय शताब्दी वर्षात साजऱ्या होणाऱ्या विविध कार्यक्रमांकरिता निधी आवश्यक आहे.

तरी सद्भक्तांकडून निधीचा ओघ असाच चालू राहिल अशी खात्री आहे.

ता.क.:- गेल्या अंकात नमूद केल्याप्रमाणे संस्कृत प्रबोधवर्ग येत्या १ जुलै २०२२ पासून सुरू करीत आहोत, हे जाहीर करताना आनंद होत आहे. त्यातही विशेष आनंद हा आहे की ह्या संस्कृत वर्गांकरिता संस्कृतप्रेमींचा लाभलेला प्रचंड प्रतिसाद हा आहे आणि श्रीदत्तगुरुंच्या कृपेने संस्कृतभारती ह्या नामांकित संस्थेने सद्भक्ती मंदिराशी संलग्न होऊन हे वर्ग चालविण्याकरिता पुढाकार घेतला आहे.

✦✦✦

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

# श्री गुरुवर्य
# श्री भाईंचे प्रवचन

२३.११.१९३०

**।। श्री गणेशाची आरती ।।**

**“जय देव, जय देव, ॐकारा गणराया, जय सद्गुरुराया।**
**आरती ओवाळूं तुज विघ्नें हराया।।धृ.।।......”**

ह्या आरतीच्या धृवपदांत गणपतीला ॐकारा सद्गुरुराया असे म्हटले आहे. ह्या विधानाला गणेश पुराणात आधार दिला आहे तो असा :-

“जो ॐकार रूपी भगवान् वेदशास्त्रांदिकांमध्ये प्रतिष्ठित आहे - अज्ञान समूहाचें हरण करणारा - लोकांचे अज्ञान नष्ट करणारा - ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांचा सारभूत, परब्रह्माचें जणू तीर - मुनींना ज्ञान देणारा व विकारापासून दूर असणारा, असा जो ब्रह्मरूप गणेश, त्यास वंदन करतो.” (गणेश पुराण)

आता गणेशाला ॐकार आणि ज्ञान देणारा असे म्हटले की त्याच्यामध्ये सद्गुरुची योग्यता आलीच, कारण सद्गुरुचे स्वरूपच मुळी ॐकार आणि ज्ञान स्वरूप आहे :-

**“ॐकार स्वरूपा, सद्गुरु समर्था। अनाथाच्या नाथा तुज नमो।।”**

तसेंच :-

**"अगा सद्गुरो शंकरा बोधरूपा। कृपाळूपणे दाविसी स्वस्वरूा।।"**

जे जीव संसार तापाने त्रस्त होऊन आत्यंतिक सुख प्राप्तीसाठी रात्रंदिवस तळमळतात. त्यांना त्या सुखाची प्राप्ती करून देण्याचे सामर्थ्य ज्याचे अंगी आहे, व ज्याच्या शब्दमात्रें करून परब्रह्माचा अनुभव शरणागत शिष्याला होतो, तो सद्गुरु, तो गणेश. कारण जर गणेश हा ॐकार आहे, व सद्गुरुही आहे, तर सद्गुरु हा ॐकाररूपच आहे. तेव्हा असे सिद्ध झाले की गणेश हा ॐकाररूप असून सद्गुरु आहे.

आता येथे असा आक्षेप येतो की वामन पंडित व तुकाराम महाराजांनी गणपतीची पूजा करणे म्हणजे व्यभिचारी भक्ति करण्यासारखे आहे असे आपल्या काव्यांत प्रतिपादन केले आहे :- **"विघ्न न हो म्हणोनी। आरंभी देवा एका प्रार्थूना। स्फूर्ती देईल हे इच्छा धरोना। प्रार्थना एका आणिकाची।। टीका ऐसी आरंभते। आणि भक्ति अव्यभिचारिणी बोलिजेते। आणि पदोपदीं निषेधिजेते। उपासना अन्य देवताची। त्यांचे परोपदेश पांडित्य।।"** तसेंच :- **"शिव शक्ति। आणि सूर्य गणपति। एकचि म्हणती विष्णूस ही।। हिरा आणि गार। दोन्ही मानिती समान। राजस भजनें वायां जाती।।"** असा संत वचनाचा मूळ सिद्धांताला विरोध येतो, म्हणून हा विरोधाभास जाऊन संशय परिहार झाला पाहिजे. तुकाराम महाराजांनी व वामन पंडितांनी वर दिलेल्या उताऱ्यांत जे प्रतिपादन केले त्याचा हेतू असा की, सर्व साधारण मनुष्यांना ह्या दैवतांना एकाएकी निष्कामतेने भजता येणार नाही. शिव, सूर्य, गणपती, देवी वगैरे देवतांच्या शुद्ध स्वरूपाकडे त्यांची मजल पोहोचणार नाही व ते देवतांच्या सगुण स्वरूपाची कोणती तरी कामना धरून उपासना करतील, व तेणें करून त्यांचे गर्भवासाचें दु:ख निवारण होणार नाही, म्हणून वाटेतला का काटा काढून टाकण्यासाठी ह्या संतांनी अन्य देवतांकडे जाऊच नका असे निर्भीडपणाने जगताला सांगून टाकिले :- **"सद्गुरुवांचून देवतांतर। पूजणें तो जाण व्यभिचार। स्व पुरुष टाकोनि वर नर। भजे ती पुश्चंली गव्हार जैसी।।"** हे रंगनाथ स्वामीचेंच वचन आहे, पण त्यांच्याच ग्रंथात आरंभी गणपतीलाच वंदन केले आहे :- **"तूंचि एकु**

**गणाधिपती। विघ्नहर्ता तूं श्रीधरमूर्ती। शारदा रूपें तूं चिच्छक्ति। प्रेरक मन्मती लागुनियां।। एवं गणेश शारदारूपें तूंची। तुजवीण व्यक्ति न भासे दुजयाची। तूंचि सर्वत्र सर्वादि सर्वांची। नाहीं अन्याची वार्ता येथ।। म्हणोनी माझिये भजनीय देवता। तूंची एकु जी सद्गुरुनाथा। नेणें मी देवतांतराची वार्ता।।"** यावरून श्री रंगनाथ स्वामींनी श्रीगणपतीला जे वंदन केले आहे, ते गणपतीच्या मायिक रूपाला केले नसून, त्याच्या शुद्ध स्वरूपाला केले आहे. तेव्हा ते वंदन अथवा पूजन व्यभिचारी पूजानांत गणले जात नाही. देवतांचे आकार-स्वरूप कसे ही असो - स्वरूप गणपतीचे असो, देवीचे असा अगर मारूतीसारख्या वानराचे असो, तसेच भक्त पुरुष असो किंवा स्त्री असो, त्याच्याशी आपणास काय करावयाचे आहे? त्याच्या आत कोण आहे ह्याकडे लक्ष दिले पाहिजे. घराकडे पाहून काय करावयाचे आहे? घरात कोण राहतो ह्याची चौकशी केली पाहिजे :- "**तुका डोंगा परि विठू नव्हे डोंगा। काय भुललासी वरलीया सोंगा।।**" तेव्हा आपल्या भावनेचा कल उपाधीमध्ये असलेल्या शुद्ध सात्त्विक चैतन्याकडे असावा, आणि त्याला अनुलक्षून भजन केले तर त्या भजनाला व्यभिचारी भजन असे म्हणता येणार नाही. याच न्यायाने विठोबा, रामेश्वर, दत्त, मांगिरीश इत्यादी देवतांचे पूजन करून ही सद्गुरुचेंच पूजन होते :-

**"म्यां शंकर पूजिला, आजि पूजिला, भावें पूजिला।।धृ.।।**
**विठ्ठलनाथ, रमाकांत नयनींदेखिला।।"**

माझ्या डोळ्याला विठ्ठलाची मूर्ती दिसली, परंतु त्या ठिकाणीं मी सद्गुरुची भावना धरली. तेव्हा व्यभिचार कोठे झाला?

**"दुरित हर श्री व्यंकटेश हृदयीं रेखिला।।"**

ज्या स्वरूपांतून व्यंकटेश प्रगट झाला, त्या मूळ स्वरूपालाच मी पाहिले, त्यात व्यभिचार कसा झाला?

**"रामेश्वर गुरुदेव दत्त शिरीं वंदिला।**
**मांगिरीश कुळस्वामी प्रेमें भेटिला।।"**

मी शिव व विष्णु कांचीला गेलो, आणि तेथे

**"शिव विष्णु द्विविध ब्रह्म एक ध्यायिला।।"**

मी शिव निराळा व विष्णू निराळा पाहिला, पण त्या दोघांच्या अनुभवाकडे पाहून ते दोघे एकच आहेत, अशी माझी खात्री झाली. तसेच मांगिरीशाला ज्या सद्गुरुचे रूप आवडते, त्या रूपांतून जेव्हा मी त्याला पाहिले, तेव्हाच त्याने मला दर्शन दिले. मी तसे केले नसते, तर त्याचे दर्शन झाले नसते.

आमचे कल्याण व्हावे म्हणून तुकाराम महाराजांनी व वामन पंडितांनी आपल्या जोरदार वाणीने इतर दैवतांचे पूजन निषिद्ध मानले. आमची मनोभूमिका अशुद्ध असल्यामुळे गणपती वगैरे देवतांच्या ठिकाणी उत्कृष्ट भावना बसणार नाही, म्हणून त्यांचे पूजन न करण्यास त्यांनी निक्षून सांगितले. हा त्यांचा ठाम सिद्धांत असल्यामुळे त्यांना हीगोष्ट मळमळीत भाषेंत सांगता आली नाही, कारण त्याचा काही उपयोग झाला नसता हे ते पूर्णपणे जाणत होते. शिवाय त्या वेळी सकाम लोकांचा भरणा विशेष असल्यामुळे त्यांचे ते बंड मोडण्यासाठी मुळाशीच घाव घालणे त्यांना भाग पडले. शिवाय ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे की ज्याच्याजवळ अमृत आहे. त्याच्याजवळ गैर समजुतीने कांजी मागितली. तर तो कांजीही देईल. परंतु खरी समजूत झाल्यावर त्याच्याजवळ अमृताची याचना केली तर तो अमृत खास देईल. तद्वत गणपती हा सद्गुरु आहे. त्याच्या अंगी जन्ममरण चुकविण्याचे सामर्थ्य आहे. हे न जाणून विषयासक्तीने त्याचा उपासना करून जर त्याच्याजवळ विषय मागितले तर तो विषयरूप कांजी देईल. परंतु ही पूजा अगर उपासना गणपतीची न होता त्या विषयांची होते. संकटे दूर होऊन विषयांचे सुख मिळावे म्हणून सकाम लोक गणेशाची पूजा कृष्ण पक्षांतील चतुर्थीला करितात. हिला संकष्टी चतुर्थी म्हणतात. ही अज्ञानी लोकांची पूजा अंधारी रात्री होत असते अर्थात अज्ञानांत होते.

(क्रमशः)

**: नारायण :**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

# श्री सद्‌गुरु
# श्री दादाभाईंचे प्रवचन

**शनिवार : १.५.४३**
**संध्याकाळी : ५.३० ते ६.३०**

गेल्यावेळी महाशिवरात्रीच्या दिवशी गोकर्णाला जाता आले नाही. कारण येतानाची अडचण होती. मोटारीची व्यवस्था नव्हती म्हणून आम्ही येथील देवळातच एकादशणी केली.

एकादशीचा खरा अर्थ दहा इंद्रिये व एक मन गुरुचरणी अर्पण करायची पण येथे आमचे मन एकीकडे व शरीर एकीकडे म्हणून तेथे न जाता तिकडेच एकादशणी केली आणि शंकर म्हणतात की माझी पूजा करण्यापेक्षा सर्वांच्या हृदयांत माझे रूप प्रगट करणे हीच माझी खरी महापूजा आहे. पहा गोसावी नंदन म्हणतात :-

**गोसावीनंदन स्मरे शिवासी हृदयकमळीं ज्वाला।**
**दृढ तर बोधें ध्यातां मनीं प्रसन्न त्यासी झाला।**
**बाई गे माझा भोळा, भोळा गे शंकर भोळा।।धृ.।।**

भोळा म्हणजे ज्याला काही समजत नाही असा नाही. श्रीभाई म्हणतात :-

**शंकर भोळा हो भोळा। कपट नसे तिळभरी म्हणुनि सदा सोहळा।।**

ज्याला अद्वैत पूर्ण बाणले आहे. सर्वांचे कल्याण करतो तो वायफळ कसा असेल ? असो. श्रीगोसावी नंदन म्हणतात बोधाची पूर्णता झाल्यावर ह्याची भक्ती करावी (शिव भुत्वां शिवं यजेत्) म्हणून श्रीभाई एका पदांत म्हणतात :-

**शिवरुपी मन लावा। शिवाची होऊनि शिव हा भजावा।।धृ.।।**

**शिवनाम घेतां। शिवगुण गातां। 'अहं' तोहि त्यजावा।।१।।**

**शिव प्रत्यगात्मा शिव अंतर्साक्षी। शुद्धे मनेंचि पहावा।।२।।**

म्हणून वशिष्ठमुनी म्हणतात :-

उपदेशक्रमो रामा व्यवस्थामात्रपालनम्।

ज्ञात्पेस्तु कारणं शुद्धा शिष्य प्रज्ञैव केवला।।

शिष्याची शुद्धमती हीच बोधाला कारण आहे. गुरु हा व्यवस्थापालनार्थ आहे. पण दोन्हीची जोड पाहिजे. दिवाळीत अनार, पणत्या व्यवस्थीत दारूने भरल्या पाहिजेत व आगपेटीही पाहिजे. एक उणे असेल तरी होणार नाही. कांड्याच्या पेट्या घरोघरी मिळतील. पण परमार्थात उलट आहे. येथे काही देणारा गुरु घरोघरी नाही.

**ब्रह्म अनुभव अनुभवती ते सज्जन साधु घरोघरी कैचे।।धृ.।।**

**वासुकि मस्तकी रत्न असे परी ते फणिराज बिळोबिळी कैचे।।१।।**

**हत्तिचे मस्तकी मुक्त असे परी ते गजराज बिदोबिदी कैचे।।२।।**

**सुवर्ण कस्तुरी नाभी असे परी ते मृगराज वनोवनी कैंचे।।३।।**

**सच्चित्सुखमय जनीं असे परी। ते यतीराज मठोमठी कैचे।।४।।**

(वामन पंडित)

सच्चिदानंद सर्वत्र भरले आहे पण तद्रूप झालेले महात्मे प्रत्येक आचार्यांच्या मठात नाही. सर्व संत आहेत खरे पण गुरु हा त्यांचा राजा आहे.

**गुरु हा संत कुळीचा राजा। गुरु हा प्राणविसावा माझा।**

सर्व वृक्षांत चंदन राजा तसा संत कुळांत गुरु आहे. संत स्वत:चा उद्धार करतात पण गुरु दुसऱ्यांना त्या पदावर आरुढ करतात. गुरु हा Teacher आहे. पण दुसऱ्यांचा उद्धार करण्याची ही शक्ति भगवंताने दिली पाहिजे. भगवंताने तेथे येऊन राहण्यास ते घर पसंत केले पाहिजे. म्हणून श्री तुकाराम महाराज प्रार्थना करतात.

**कामक्रोध वैरी घालुनि बाहेरी। तूं राहे अंतरी पांडुरंग।**

**तुका म्हणे चित्त करावें निर्मळ। येऊनि गोपाळ राहे तेथे।।**

**काय या वेगळें उरले आणिक। वैकुंठनायक जया कंठी।।**

यावरून श्री तुकाराम महाराजांच्या हृदयांत भगवान वास करत होते. त्यांच्या मुखांतून बोलत होते म्हणून अनेक जडजीवांचा उद्धार झाला असे महात्मे फार विरळे म्हणून श्रीनाथ म्हणतात :-

**ऐसे प्राप्त पुरुष। संसारी नाहीं गा बहुत।**

**हिंडल्या अवघ्या जगांत। एखादा कदाचित देखिजे।।**

आणि हेंच श्री वामन पंडित म्हणतात :-

**सच्चित्सुखमय जनीं असे परी। ते यतिराज मठोमठीं कैचे।।४।।**

मला ज्या सच्चिदानंदयतीने सच्चित्पदावर आरूढ केले अशा जातीचे मुनी प्रत्येक मठात नाही. प्रथम श्री वामन पंडित म्हणजे सर्व पंडितांना वादांत जिंकणारे. दिवसा मशाली घेऊन जाणारे म्हणून त्यांना अभिमान झाला माझ्यासारखा पंडित कोणी नाही.

**अभिमानदत पुरुषाशी। मी हृषीकेशी कदा नातळे।।** (ए.भा.)

म्हणून ते श्री तुकाराम महाराजांकडे गेले. श्री तुकाराम महाराजांनी त्यांनाच ब्राह्मण म्हणून नमस्कार केला व म्हणाले की येथें कशाला येता. प्रत्यक्ष रुद्रावतार श्रीरामदास त्यांच्याकडे जा. ते तिकडे गेले पण समर्थांनी पाहिलें हे प्रकरण मोठे आहे. वादविवाद करीत बसले तर त्यातच सर्वकाळ जाईल पहा मोठे झाले म्हणजे सर्व दूर करतात म्हणून श्रीरामकृष्ण परमहंस म्हणतात I want to become a child. त्यात जे सुख ते विद्वान होण्यात नाही. भगवान निर्गुणसगुण दोन्ही आहे. तुम्ही म्हणाल तसा तो होतो. तुमच्याप्रमाणे तो चालतो. असो. श्री वामन पंडित श्री तुकाराम महाराजांकडून गेले करे पण त्यांनी त्यांचा अधिकार खरा जाणला म्हणून ते म्हणतात :-

**ज्याची वदे पूर्ण वेदांत वाणी म्हणावे कसे हो तयालागीं वाणी।।**

आम्ही कोणीच त्यांना ओळखले नाही. आज आम्ही जी दु:खं भोगतो त्याचे कारण पूर्वी केलेला संतांचा छळ. भगवंत त्यांचे गुणदोष पाहत नाही मग आम्हाला

काय अधिकार आहे?

**देवादीते पारखे। भक्त ते माझे सखे।**

**भक्तांचे मी न देखे। गुण दोष काही।।**

भगवान म्हणतात :- "माझी ती लाडकी बालके आहेत. त्यांचे दुर्गण काढून त्यांना मद्रूप करण्यास मी एकटा समर्थ आहे. मला दुसऱ्यांची मदत नको. कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं अशी माझी शक्ती आहे." तेव्हा हरीभक्तांचे, गुरुभक्तांचे दोष काढू नयेत. आपल्यात काय दोष कमी आहेत? पण ते दिसत नाही. दुसऱ्यांचे फक्त दिसतात. संतांचे उलट असते त्यांना आपले दोषच दिसतात.

**माझे मज कळो येती अवगुण। काय करू मन अनावर।।** (तु. म.)

श्रीभाई म्हणतात :- "भक्तीच्या योगे संतांच्या दोषांची पिशवी पुढे व गुणांची मागे असते. मागून येणारे त्यांचे शिष्य त्यांना त्यांचे गुण दिसतात व पुढून येणारे opponents, त्यांना दोष दिसतात. संतांचे दोष पाहून टीका करून आपल्याला काही फायदा होत नाही. उलट तोटाच होतो. ते कर्म जन्ममरण देणारे आहे. तेव्हा ज्याला ते चुकवायचे असेल त्याने निंदा करू नये. कारण सर्वत्र भगवानच आहे. मग कोणाचीही निंदा केली तरी भगवंताची होते. ज्याला सर्व आपण करायचे त्याने निंदादोष पाहण्याचे सोडून द्यावे. जे मुक्त आहेत त्याना सर्व मुक्तच दिसतात. निंदा, मोह, मत्सर काढण्याला एकच उपाय आहे."

**अर्जुना तूं जाण रे। होशील सुजाण रे।**

**विश्व नाही मीच आहे। सखया तुझी आण रे।।** (वामन पंडित)

सर्व जगच ब्रह्मरूप, भगवद्रूप करावे. तात्पर्य संताप्रमाणें आपल्याला आपले दोष दिसू लागले. म्हणजे दुसऱ्याचे गुण दिसू लागतील व तेणेकरून हा गुणी होईल. असो.

**जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी, कसें हो म्हणावे तयालागीं वाणी।।**

श्री तुकाराम महाराजांचे अभंग म्हणजे वेदांपेक्षाही थोर. कारण ते अनुभवाचे आहेत. वेदांना अनुभव नव्हता.

**परब्रह्म रुपी असा जो तुकावा। तयाचे तुकीं कोण दुजा तुकावा।।**

*(क्रमश:)*

।।श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

# (जुलै ते सप्टेंबर २०२२) महिन्यातील उत्सव व महोत्सव

**आषाढ ते भाद्रपद मास :**

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. १०.७.२०२२ | आषाढी एकादशी. सकाळी स्तवन व प्रार्थना. (शंकर सुधा पान नं. ५४ वाचणे) |
| बुधवार | दि. १३.७.२०२२ | गुरुपौर्णिमा. सकाळी स्तवन व प्रार्थना ११.३० गुरुपादुकास एकादशणी. त्यानंतर महाप्रसाद. सायंकाळी परमार्थ दीपिका वाचन. |
| गुरुवार | दि. १४.७.२०२२ | ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |
| शुक्रवार | दि. १५.७.२०२२ (आषाढ कृ. २) | परमपूज्य श्री दादाभाई जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. १०.०० वाजता जन्मोत्सव पाळणा व पदे. ११.३० एकादशणी सायंकाळी चरित्र वाचन. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव. |
| रविवार | दि. १७.७.२०२२ | नामसंकीर्तन. |
| सोमवार | दि. १८.७.२०२२ (आषाढ कृ. ५) | आद्य सद्‌गुरु श्री नारायण महाराज पुण्यतिथी व जयंती दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी चरित्र वाचन. |
| मंगळवार | दि. १९.७.२०२२ | ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |
| मंगळवार | दि. २६.७.२०२२ (आषाढ कृ. १३) | श्री नामदेव महाराज पुण्यतिथी. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| बुधवार | दि. २७.७.२०२२ (आषाढ कृ. १४) | श्री संत सावता माळी पुण्यतिथी. सकाळी स्तवन व प्रार्थना. |

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. १.८.२०२२ | इंग्रजी तारखेनुसार श्री भाईंचा जयंती दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| सोमवार | दि. ८.८.२०२२ (श्रावण शु. ११ पुत्रदा एकादशी) | गुरुवर्य श्री भाईंचा जयंती दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. श्री भाईंचे चरित्र वाचन. सायंकाळी ७.४७ वाजता जन्म पाळणा व पदे. |
| गुरुवार | दि. ११.८.२०२२ (श्रावण पौर्णिमा नारळी पौर्णिमा) | श्रावणी व होम हवन |
| शनिवार | दि. १३.८.२०२२ (श्रावण कृ. १) | सिद्धारुढ स्वामी पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी श्री सिद्धारुढ स्वामींच्या चरित्राचे वाचन. |
| गुरुवार | दि. १८.८.२०२२ (श्रावण कृ. ८) | श्री कृष्ण जयंती व लक्ष्मण महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. श्री कृष्ण जन्म व पाळणा रात्रौ १२.०० वा. श्री रमावल्लभ दासांची पदे रात्रौ १०.३० वा. |
| शुक्रवार | दि. १९.८.२०२२ (श्रावण कृ. ९) | गोपाळकाला. सद्भक्ति मंदिराचा वर्धापन दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. |
| बुधवार | दि. ३१.८.२०२२ (भाद्रपद शु. ४) | श्री गणेश चतुर्थी. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. ६.९.२०२२ (भाद्रपद शु. ११) | श्री निरंजन रघुनाथ स्वामी पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| रविवार | दि. ११.९.२०२२ (भाद्रपद शु. १) | श्री दादाभाई महालय दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. |
| बुधवार | दि. २१.९.२०२२ (भाद्रपद शु. ११) | श्री बलभीम महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |

# ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२

**आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष मास :**

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. २६.९.२०२२ (आश्विन प्रतिपदा) | घटस्थापना : श्री सरस्वतीचा फोटो ठेवणे. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. प्रतिपदा ते नवमीपर्यंत सायंकाळी ५ वाजता 'कलौ चंडी विनायको' व नवरात्र उपासना वाचन. |
| बुधवार | दि. ५.१०.२०२२ (आश्विन शुद्ध दशमी - विजया दशमी दसरा) | सद्भक्ति प्रसारक मंडळीचा वर्धापन दिन. या दिवसापासून मंदिराच्या शताब्दी महोत्सवास प्रारंभ होईल. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी व सायंकाळी ६ वाजता पालखी मिरवणूक. ही पालखी मिरवणूक दोन्ही सोसायट्यांमधून फिरते. |
| रविवार | दि. ९.१०.२०२२ | कोजागिरी पौर्णिमा. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ७ वाजता रासलिलाभिनय. श्री कृष्णभक्तिपर पदे. |

## गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथ्योत्सव

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. १२.१०.२०२२ (आश्विन वद्य तृतीया) | गुरुवर्य श्री भाई आणि श्री बाळेकुंद्री महाराजांचा पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना ११.३० वाजता एकादशणी ब्राह्मण सुवासिनी संतर्पण. महाप्रसाद.<br>सायंकाळी ५ वाजता चरित्रवाचन. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सवन. |
| गुरुवार | दि. १३.१०.२०२२ (आश्विन वद्य चतुर्थी) | सायंकाळी ६ वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. १४.१०.२०२२<br>(आश्विन वद्य पंचमी) | सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन. |
| शनिवार | दि. २२.१०.२०२२<br>(आश्विन वद्य द्वादशी) | गुरुद्वादशी सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी.<br>रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक. |
| सोमवार | दि. २४.१०.२०२२<br>(आश्विन वद्य चतुर्दशी) | नरकचतुर्दशी प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता श्री रामेश्वर मंदिरात 'उद्धव-गोपी' गीत व सामुहिक भजनाचा कार्यक्रम. |
| **कार्तिक मास :** | | |
| बुधवार | दि. २६.१०.२०२२<br>(कार्तिक प्रतिपदा) | बलि प्रतिपदा प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता गुरुवर्य भाईंच्या सुखासनानिमित्त झालेले सद्‌गुरु दादाभाईंचे प्रवचन वाचन. ११.३० वाजता एकादशणी. |
| शुक्रवार | दि. ४.११.२०२२<br>(कार्तिक शुद्ध एकादशी) | प्रबोधिनी एकादशी सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५ वाजता 'पंढरीचा प्रसादमेवा' या प्रवचनाचे वाचन. |
| सोमवार | दि. ७.११.२०२२<br>(वैकुंठ चतुर्दशी) | कार्तिक शुद्ध चतुर्दशी व त्रिपुरारी पौर्णिमा. (कार्तिक पौर्णिमा) गुरुवर्य श्री भाईंचा अस्थि विसर्जन दिन. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५ वाजता श्री भाईंच्या वैकुंठारोहणा विषयी झालेल्या सद्‌गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. रात्रौ ८ वाजता कमळे वाहणे. |
| बुधवार | दि. १६.११.२०२२<br>(कार्तिक वद्य अष्टमी) | श्री काळभैरव अष्टमी. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. २२.११.२०२२<br>(कार्तिक वद्य त्रयोदशी) | श्री ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी दिन. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. |

**मार्गशीर्ष मास :**

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. २.१२.२०२२ (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) | श्री निरंजन स्वामी पादुका स्थापना दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. सकाळी ११.३० वाजता एकादशणी. |
| शनिवार | दि. ३.१२.२०२२ (मार्गशीर्ष शुद्ध एकादशी - मोक्षदा एकादशी) | श्री गीता जयंती व श्री माणिक प्रभू पुण्यतिथी दिन. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता श्री भगवद्गीतेचे सामूहिक पठन. |
| बुधवार | दि. ७.१२.२०२२ (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) | श्री दत्तजयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी व त्यानंतर महाप्रसाद. श्री दत्तजन्मोत्सव सायंकाळी ६ वाजता. पाळणा व इतर पदे. रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक. |
| गुरुवार | दि. ८.१२.२०२२ | सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन. |
| बुधवार | दि. १४.१२.२०२२ (मार्गशीर्ष वद्य षष्ठी) | श्री मोरया गोसावी पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| रविवार | दि. १८.१२.२०२२ (मार्गशीर्ष वद्य दशमी) | श्री रंगनाथ स्वामी पुण्यतिथी दिन. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. |
| रविवार | दि. २५.१२.२०२२ (ख्रिसमस - नाताळ) | श्री येशू ख्रिस्त जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

✦✦✦

# परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

## अमृत कण

१) महाराष्ट्रातील संतांनी खऱ्या अर्थी समाज सुधारणा घडविली. त्यांनी केलेली विठ्ठलाची उपासना म्हणजे महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची नांदी आहे. ज्ञानेश्वरादि संतांनी दैवतांचे उदात्तीकरण केले. संतपरंपरेचा कळस ठरलेल्या तुकारामांनी नाम व भक्ती यांना व्यापक आशय दिला. शाश्वत नैतिक मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या तुकारामांनी मानवी मनाच्या शक्तीचे गुणगान केले. यातून त्यांच्या सांस्कृतिक प्रबोधनाचे सामर्थ्य व्यक्त होते.

२) प्रेम, प्रसाद आणि प्रतिमा या तिघांचा रम्य संयोग खऱ्या जातीवंत संतांच्या वाणींत झालेला असतो. धर्म, तत्वज्ञान, कवित्व, साहित्य साऱ्यांची जणू एक मूसच!

३) प्रक्षुब्ध भावनांना आवर घालून विवेक आणि समंजसपणा दाखविण्याची आज  अत्यंत गरज आहे.

४) आपण इथून जाताना बरं काही घेऊनही जातो. इथलं प्रेम, इथला जिव्हाळा, इथली करूणा, इथले ऋणानुबंध हे सारं आपण घेऊन जात असतो. कदाचित आजचा हा अस्त उद्यांचा उदयाची बीजं पेरीत तर नसेल ना?

५) उदयांत सुखाची बीजं दडलेली असतात तर अस्तांत दु:खाची परिसीमा साठवलेली असते. उदयात उमलणं असतं तर अस्तात कोमजणं असतं.

६) कोणत्याही घटना आकस्मिकरित्या घडत नाहीत. त्यामागे काहीतरी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कार्यकारण भाव हा असतोच. तो विचारात घेणे क्रमप्राप्त असते.

७) काळाच्या ठिकाणी किमानपक्षी दु:ख बोथट करण्याचं विलक्षण सामर्थ्य आहे. माणसांतील सर्जनशीलता जिनं भल्याभल्यांना दु:खाच्या डोहांतून बाहेर पडण्यासाठी हात दिला आहे. प्रकाशाच्या किनाऱ्यावर आणलं आहे.

८) आजूबाजूला लोक मृत्यू पावत असताना आपण मात्र जगणार आहोत असे गृहित धरून माणूस आपले व्यवहार करीत असतो. हा जगातील सर्वात मोठा चमत्कार आहे.

◈◈◈

## : देणगीदारांसाठी निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबई बाहेर, काही महाराष्ट्रा बाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरूवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता सद्भक्ती प्रसारक मंडळींचे दोन बँक अकाऊंट्स आहेत. त्यापैकी कुठल्याही एका अकाऊंटला पैसे पाठवू शकता. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| **Name of the Account** | **:** | **SADBHAKTI PRASARAK MANDALI** |
| **Bank Name** | **:** | NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Account No** | **:** | 00610010000130 |
| **IFSC Code No.** | **:** | NKGS0000006 |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |
| | | **OR** |
| **Bank Name** | **:** | Bank Of India |
| **Account No** | **:** | 016410110005797 |
| **IFSC Code No.** | **:** | BKID0000164 |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |

ज्या भक्तांना नेट बँकिंगचा उपयोग न करता पैसे चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवायचे असतील, त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावे. त्वरित आणि सुरक्षित डिलिव्हरी करिता स्पीडपोस्ट किंवा कुरिअरचा वापर करावा.

**Mr. Vivek Tamhane**
Tamhane & Mehta (Chartered Accountants)
1, Gauresh Apartment, Ground Floor, Old Police Lane,
Near Andheri Court, Andheri (East), Mumbai : 400 069.
**Tel No. : 022-2683 2838**

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-

**१. श्री. विवेक ताम्हाणे भ्रमणध्वनी : ९८२०३५०८६७**
**२. श्री. नागानंद निळेश्वर भ्रमणध्वनी : ९८२१२७०७७२**
**३. श्री. अरूण विजयकर भ्रमणध्वनी : ९२२३२२२२४५**

✦✦✦